# मेहेर घुमवा रे गगनी

मेहेर घुमवा रे गगनी
अवतार मेहेरबाबा की जय!!

1. मेहेर मेहेर गरजा सारे, तरू शिखरातुनी घुमवा नारे
   होईल पावन जीवन सारे, मेहेरज्योतीचे दीप पेटवा,
   अंधारी काननी ।।1।।

2. मेहेर नामे डंके पिटवा, होतील जागी काशी मथुरा
   ह्या संधीचा लाभ हो उठवा, परोपरीने सांगे ज्ञाना
   मौनातून गर्जूनी।।2।।

3. ईश्वर असता समोर अपुल्या, नको दाखवू त्यास वाकुल्या
   माय तुझी ती बघ रे छकुल्या, माय आपुली ना ओळखसी
   मायेतच झिंगुनी।।3।।

4. मोती दडले माया सागरी, मेहेरा ने ते शोधूनि काढूनी
   केली सुटका शिंपल्यातूनी, मोत्यांचा वर्षाव करी तो
   मुक्तीच्या अंगणी।।4।।